महासागर अमरावती

रविवार, दि. 29 सप्टेंबर 2024



# बाईक रॅलीचा मार्ग बदलला

## मात्र अलर्ट कायम, शहराच्या विविध भागातून शक्तीप्रदर्शन

## 149 पोलीस अधिकारी व 1152 पोलीस अंमलदार तैनात



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.28 )-भाजपचे नेते आ.नितेश राणे यांच्या अचलपूर दौऱ्यामूळे अचलपूर, परतवाडा जुळ्या नगरीत पोलिसांचा हाय अलर्ट आहे. दोन गट समोरासमोर येत तणावाची परिस्थिती उदभविण्याची भीती असताना शनिवारी( दि.28 ) आयोजकांनी पोलीसांच्या विनंतीवरुन बाईक रॅलीचा मार्ग बदलण्याचा निर्णय घेतला, त्यामूळे काही अप्रिय घटना उद्भविण्याची शक्यता थोडी कमी झाली आहे, मात्र पोलिसांचा अलर्ट कायम आहे, शनिवारी अचलपूर शहराच्या विविध भागातून पोलिसांनी शक्तीप्रदर्शन केले. उद्या रविवारी( दि.28 ) 149 पोलिस अधिकारी आणि 1152 पोलीस अंमलदार असे 1300 हून अधिक पोलिसांचा वॉच राहणार असल्याने अचलपूर शहर पुन्हा एकदा पोलीस छावणीमध्ये बदलणार आहे.**





परतवाडा येथील शक्ती फाउंडेशन तर्फे रविवार दि.29 सप्टेंबर 2024 रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, अचलपुर येथे सभेचे आयोजन करण्यात आले असुन त्याकरीता आ.नितेश राणे हे प्रमुख वक्ते म्हणून हजर राहणार आहेत. त्यापुर्वी दुपारी 4 वा. ते सायंकाळी 6 वा. पर्यंत चांदुर बाजार नाका येथुन बाईक रॅलीला सुरूवात होवून अचलपुर व परतवाडा शहरातुन कृषी उत्पन्न बाजार समिती, अचलपुर पर्यंत बाईक रॅलीची परवानगी मिळण्याची आयोजकांकडुन प्रशासनास विनंती करण्यात आली होती. परंतु सदर मार्ग हा संमिश्र वस्तीचा व जातीयदृष्ट्या संवेदनशिल असल्याने या मार्गावरून बाईक रॅली निघाल्यास तणावाची परिस्थीती निर्माण होवुन शहरामध्ये शांतता व सुव्यवस्था बाधीत होण्याची दाट शक्यता प्रशासनास वाटत होती. त्यामुळे पोलीस प्रशासनाचा सदर मार्गावर रॅली काढण्यास नकार होता. परंतु आयोजकांनी बाईक रॅलीच्या मार्गात बदल करण्याची भुमीका दर्शविल्याने जुळया शहरातील समाजातील विविध घटकातील प्रतिष्ठीत नागरीकांना विश्वासात घेवुन त्यांचेशी चर्चा करण्यात आली. त्यामध्ये त्यांचे कडुन जातीय तणाव निर्माण होण्याची शक्यता कमी असेल असा मार्ग सुचविण्यात आला.

### पोलिसांना सहकार्य करावे

या सभा व बाईक रॅलीचे अनुषंगाने सोशल मिडीया किंवा इतर ठिकाणी कोणीही कसल्याही प्रकारची अफवा पसरवु नये तसेच नागरीकांनी अश्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवु नये व अचलपुर-परतवाडा या जुळया शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधीत ठेवण्यास पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन पोलीस अधिक्षक विशाल आनंद यांचेवतीने जुळया शहरातील व परिसरातील नागरीकांना करण्यात आले आहे.

### असा आहे पोलीस बंदोबस्त

या रॅली व सभा बंदोबस्ता करिता पोलीस प्रशासनाकडुन आवश्यक सर्व पुर्वतयारी करण्यात आली असुन सदर बंदोबस्ता करिता 01-अपर पोलीस अधिक्षक, 06-पोलीस उप- अधिक्षक, 35-पोलीस निरिक्षक, 108-स.पो.नि./पो.उप.नि., 712-पोलीस अमंलदार, 50-वाहतुक अमंलदार, तसेच राज्य राखीव दलाच्या 03 कंपन्या, आर.सी.पी.चे 03 प्लॉटून, क्यु, आर.टी.चे 01 प्लॉटून असे एकुण 149 पोलीस अधिकारी व 1152 पोलीस अमंलदार नेमण्यात आले आहे.

### नविन मार्गात देवडी व चावलमंडी वगळली

पोलीस प्रशासनाकडुन पाहणी करण्यात आली व आयोजकांनी मागणी केलेल्या मुळ मार्गात बदल करून चांदुर नाका अचलपुर नाका माळवेशपुरा गेट-बियाबाणी-पो.स्टे. अचलपुर-झेडा चौक तहसिल कार्यालय- जयस्तंभ चौक-सदर बाजार-टि.व्ही.टावर चौक नृसिग मंदीर ते कृषी उत्पन्न बाजार समिती, अचलपुर यामार्गाने दि.29 सप्टेंबर 2024 रोजी संध्याकाळी 6 वा ते 8 वा. पावेतो बाईक रॅलीची परवानगी आयोजकांना देण्यात आली आहे.

### मुस्लीम समाजाबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य



अहमद नगर येथील सभेत नितेश राणे यांनी मुस्लीम समाजाबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने मुस्लीम बांधवांच्या भावना दुखावल्या आहेत. तर हिंदु समाजाच्या गणेश विसर्जना दरम्यान ठिकठिकाणी दगडफेकीच्या घटना पाहता गणेश भक्तांच्या भावना दुखावल्या आहेत. त्यामुळे त्याचे पडसाद अमरावती जिल्हयालगत असलेल्या अकोला, अकोट येथे उमटुन दंगली घडल्या आहेत. सरमसपूरा हद्दीतही 17 सप्टेंबर रोजी दोन समाजात दगडफेक होऊन जातीय तनाव निर्माण करण्याचा प्रयत्न झालेला आहे. अशा या रॅली दरम्यान हिंदु व मुस्लीम समाजात तेढ निर्माण होऊन शांतता भंग करण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे पोलिसांनी कायदा सुरक्षेसाठी उपाययोजना म्हणून एक्शन मोडवर येत ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त लावलेला आहे.

### कायदा मोडणाऱ्यांची हयगय नाही



शहरात 29 सप्टेंबर रोजी होणारी आक्रोश सभा व रॅली पाहता पोलिसांचा कडक बंदोबस्त लावण्यात आला आहे. कायदा मोडणाऱ्यांची हयगय केल्या जाणार नाही. पोलिस प्रत्येक घटनेवर लक्ष देऊन आहेत. त्याचप्रमाणे सोशल मिडिया व इतर माध्यमातून जातीय तेढ निर्माण होईल असे आक्षेपार्य मॅसेज, पोस्ट, व्हीडीओ व्हायरल केल्यास कायदेशीर कारवाई केल्या जाईल. शहरात शांतता आहे. कुठल्याही संशयास्पद हालचाली वाढल्यास तत्काळ पोलिसांना माहीती द्यावी. कायदा मोडणाऱ्यावर कडक कारवाई केल्या जाईल.

**पंकज कुमावत, ग्रामिण पोलिस अधिक्षक, अमरावती**

# कंचे खेळण्याचा वाद तलवारीपर्यंत पोहोचला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )**-कंचे खेळण्याच्या कारणावरून दोन अल्पवयीनांनी एका तरुणावर तलवारीने हल्ला केल्याची घटना गाडगेनगर पोलीस ठाणे हद्दीतील हबीब नगरमध्ये 27 सप्टेंबर रोजी रात्री 8.30 वाजता घडली. या घटनेच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी अल्पवयीन मुलांकडून दोन तलवारी जप्त केल्या आहेत. जमील खान मिया खान (48, रा. हबीब नगर) हे 27 सप्टेंबर रोजी घरी हजर होते. यावेळी काही मुले घराबाहेर कंचे खेळत होते. त्यामुळे मुलांचा आवाजाने त्यांच्या आईच्या प्रकृतीवर प्रभाव पडत होता. त्यामुळे जमील खान घरातून बाहेर गेले आणि त्यांनी मुलांना सांगितले की, माझ्या आईची तब्येत ठीक नाही, जर तुम्ही आवाज केला तर माझ्या आईची तब्येत आणखी बिघडेल. त्यामुळे तुम्ही दुसरीकडे खेळायला जा. त्यावेळी ते अल्पवयीन तेथून निघून गेले. परंतू काही वेळानंतर जमील खान त्याच्या मित्रासोबत घराबाहेर उभे असताना, अल्पवयीन व त्याच्या दोन ते तीन साथीदारासह तेथे आले आणि त्यांनी जमील खान यांच्या डोक्यावर मागून तलवारीने वार केले. त्यामुळे डोक्याला दुखापत होऊन रक्तस्त्राव सुरू झाला. दरम्यान त्यांनी तलवारीचा दुसरा वार हाताने रोखला. त्यानंतर त्यांच्या इतर साथीदारांनी त्यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. या घटनेनंतर जमील खान यांनी याप्रकरणी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली.

## पत्नीवर चाकूने हल्ला

**अमरावती** - घरात भाड्याने राहणाऱ्या तरुणाच्या हातावर टॅटू दिसला आणि त्याच टॅटूचे छायाचित्र पत्नीच्या मोबाईलमध्ये दिसले. या कारणावरून पतीने पत्नीवर चाकूने हल्ला केला. याप्रकरणात पत्नीच्या तक्रारीवरून वरुड पोलिस ठाण्यात 27 सप्टेंबर रोजी पती नरेश संतोष वानखडे (44, रा. जाईन्ट चौक, गणेश नगर, वरुड) याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# नोव्हेंबरपर्यंत पैसे मिळतील, पुढे पैसेच राहणार नाहीत!

## लाडक्या बहिण योजनेबाबत राज ठाकरेंचे भाकीत

## महिलांना सक्षम करायचे असेल तर उद्योग उभारायला हवे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.28 )** - शासनाने आणलेल्या लाडकी बहीण योजनेतून नोव्हेंबर पर्यंत पैसे मिळतील. परंतु पुढे डिसेंबर, जानेवारीमध्ये मात्र सरकारच्या तिजोरीत पगाराला पैसे राहणार नाहीत. असे भाकीत करित, जर महिलांना सक्षम करायचे असेल तर उद्योग उभारणी करण्याची गरज आहे. सरकारकडे कोणीही फुकट काहीही मागत नसल्याचे राज ठाकरे यांनी सांगितले.



शनिवारी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना शासनाच्या चुकीच्या धोरणावर एकप्रकारे नाराजी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे शुक्रवारपासून अमरावतीमध्ये आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ते विदर्भातील प्रत्येक विधानसभा निहाय पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेत आहे. यावेळी त्यांनी माध्यमांशी अनोपचारीक संवाद साधला. ते म्हणाले शेतकऱ्यांनी कधीही राज्यात फुकट वीज मिळावी म्हणून आंदोलने केलेली नाहीत. परंतु तरीही सरकारने फुकट वीज देण्याचा निर्णय घेण्यात आला. सत्ताधारी आणि आज विरोधात असलेले तेही कधीतरी सत्तेत होते, त्यांना ज्या प्रकारची प्रश्न माध्यमांकडूनही विचाराणे अपेक्षित आहेत, तशी प्रश्न उपस्थित केली जात नाहीत. लाडकी बहीण योजनेतून ऑक्टोंबर, नोव्हेंबर पर्यंत पैसे महिलांना मिळतीलही परंतु त्यानंतर काय? जानेवारीत तर सरकारच्या तिजोरीत पगार द्यायला पैसेच उरणार नाहीत. त्यामुळे सक्षमीकरणासाठी उद्योग उभारायचे सोडून फुकट पैसे देण्याची सवयी काय लावताय असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला.

### पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साह आहे

आढावा बैठकीमधून पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साह पहायला मिळत आहे. अनेकजण निवडणूक लढविण्यास तयार आहेत. तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये प्रवेश घेण्यासाठीही अनेक इच्छुक आहेत. तसेच या बैठकीमध्ये कोणाचीही उमेदवारी जाहीर होणार नसल्याचेही राज ठाकरे यांनी स्पष्ट केले.

# भाडे तत्वावरील फ्लॅटमध्ये चालायचे अश्लील कृत्य

## नांदगाव पेठ हद्दीतील बेस्ट अपार्टमेंटमधील प्रकार उघड

### पैसे घेऊन जागा करून द्यायचे उपलब्ध



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.28 )** - नांदगावपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जावरकर लॉनमागे असणार्या बेस्ट अपार्टमेंटच्या एका फ्लॅटमध्ये प्रेमीयुगलांना अश्लिल चाळे करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार 27 सप्टेंबर रोजी उघडकीस आला. नागरिकांच्या तक्रारीवरून नांदगाव पेठ पोलिसांनी ही कारवाई केली असून, याप्रकरणात पोलिस उपनिरीक्षक सुनिल खंडारे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी रोहन नाईक (24, रा. अंबागेट), महेश गजाननराव कोल्हे (27, रा. राम नगर), प्रिन्स डडलानी (24, रा. दस्तुरनगर), श्रीजित प्रमोद शिंगणवाडे (रा. राम नगर), वेदांत गतफणे (24, रा. जकातनाका), मुकेश अनासने (45, रा. अमरावती), सागर रामनाथे (23, रा.राम नगर), ऋतिक राऊत (21, रा. जिल्हा परिषद शाळेजवळ, शेगाव) आणि एका महिलेविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बेस्ट अपार्टमेंटचा एक फ्लॅट भाड्याने देण्यात आला होता. परंतू या ठिकाणी तरुण-तरुणींना बोलावून गैरवर्तन केले जात असल्यामुळे नागरिकांध्ये रोष निर्माण झाला होता. काही तरुणांनी हा फ्लॅट भाड्याने घेऊन तेथे प्रेमीयुगुलांना अश्लील कृत्य करण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली होती. या प्रकारामुळे फ्लॅटमध्ये दिवसभर तरुण-तरुणींची वर्दळ सुरु असायची. या प्रकाराबद्दल कोणीही हटकल्यावर, त्यांना जीवानिशी ठार मारण्याची धमकी देण्यात येत होती. त्यामुळे येथील रेसिडेन्सीतील नागरिकांनी पोलिसांकडे तक्रार दिली. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी फ्लॅटवर छापा टाकून, तेथून काही तरुणांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याविरुध्द कायदेशिर कारवाई केली. याप्रकरणात पोलीस उपनिरीक्षक सुनील खंडारे यांच्या तक्रारीवरून नांदगावपेठ पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविला.

> नागरिकांची तक्रार नांदगावपेठ पोलिस ठाण्यात प्राप्त झाली होती. त्यावरून पोलिसांनी घटनास्थळावरून चार आरोपींना ताब्यात घेतले. ज्यांची चौकशी करून त्यांना नोटीस देऊन सोडून देण्यात आले.
>
> **आसाराम चोरमले, पोलीस निरीक्षक**

# महिला ग्रामसेवकाला सदस्याकडून मारहाण

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.28 )** - ग्रामसेवक पदावर कार्यरत असलेल्या महिला कर्मचारी यांना ग्रामपंचायत सदस्याने हात धरून मारहाण केल्याची घटना 28 सप्टेंबर रोजी गणेशपुर येथे घडली. पोलीस सूत्रानुसार माधुरी दामोदर देवघरे (वय 42) या गणेशपुर येथे सन 2021 पासून ग्रामसेवक पदावर कार्यरत आहे. 28 सप्टेंबर रोजी सकाळी 10-30 वाजता ग्रामपंचायत कार्यालय गणेशपुर येथील सभागृहात अटल भुजल योजनेबाबत मिटींग सुरु होती. त्यावेळी ग्रामपंचायतच्या आवारामध्ये ग्रामपंचायत सदस्य प्रकाश रामदास आजनकर (38, वर्ष रा.गणेशपुर) हा जोरजोराने शिवीगाळ करित होता. दरम्यान महिला ग्रामसेवक या मीटिंगमधुन उठुन त्यांना शिवीगाळ का करता? असे समजाविण्यास गेल्या असता त्यांनी ग्रामसेवक यांना उडवा उडवीचे उत्तर देऊन मला मिटींगमध्ये का बोलाविले नाही, तेव्हा त्यांनी ही मीटिंग ग्रामपंचायत कार्यालयाची मासिक सभा नसून अटल भुजल योजनेबाबतची मिटींग आहे असे सांगितले. त्या महिला ग्रामसेवक पुन्हा ग्रामपंचायत कार्यालयाचे मिटींग हॉलमध्ये गेल्या. त्यानंतर मिटींग सुरु असतांना काही वेळाने प्रकाश रामदास आजनकर हा मिटींग हॉलमध्ये आला व पुन्हा सर्व समक्ष तुम्ही मला मिटींगमध्ये का बोलाविले नाही असे म्हणत जोरजोराने अश्लील भाषेत शिवीगाळ करून मारहाण केली.

# पायलटने विमानाची उड्डान घेण्यास दिला नकार

## उद्योग मंत्र्यांना कारने गाठावे लागले संभाजीनगर

## शिवसेना जिल्हा प्रमुख अरुण पडोळेंची लोणी पोलिस ठाण्यात तक्रार



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 28 )**- उदयोग मंत्री उदय सावंत यांचा अमरावती दौरा आटोपल्यानंतर ते बेलोरा विमानतळावरून अहमदनगरकडे निघणार होते. परंतू अचानक त्यांचा विमान दौरा रद्द करण्यात आल्याने गोंधळ उडाला होता. मंत्री उदय सावंतयांचा नियोजीत नागपुर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर दौर्यामध्ये संशयास्पदरीत्या अडथळा निर्माण करण्यात आला. अचानक त्यांचा बेलोरा विमानतळावरून अहमदनगर जाणारा दौरा रद्द करण्यात आला. वेळेवर विमानाच्या वैमानिकाने विमान उड्डान भरण्यास नकार दिला. त्यामुळे उद्योग मंत्री सावंत यांना पोलिसांच्या स्काडच्या सरंक्षणात बाय कारने अहमदनगर जावे लागले आहे. उद्योग मंत्री सावंत यांच्या दौर्यामध्ये संशयास्पदरीत्या अडथळा निर्माण करण्यात आला असून, उद्योग मंत्री यांच्या नियोजित कार्यक्रमात अडथळा आणणार्या संबधितांनावर कडक कारवाई करण्यात यावी. अशा आशयाची तक्रार अमरावती शिवसेना जिल्हा प्रमुख अरुण दमडाजी पडोळे (48, रा. श्रीरामनगर, अमरावती) यांनी शुक्रवारी सायंकाळी लोणी टाकळीचे ठाणेदार यांच्याकडे केली आहे.



महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री उदय सांमत यांचा 27 सप्टेंबर रोजी महाराष्ट्राची उदयोग भरारी कार्यक्रमाकरिता नागपुर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर येथे नियोजीत दौरा होता. एकाच दिवशी तिन कार्यक्रम असल्यामुळे या दौर्यासाठी मुंबईतील के एअर कंपनी यांना आगाउ सुचना दिल्या होत्या. त्यानुसार कंपनी मार्फत तस्स्नस्ज्ञक्र्श्चरू त150, ढ्ढ्रक्रस्नज्ञ हे नेमण्यात आले होते. नियोजित दौर्यानुसार मंत्री सावंत हे महाराष्ट्राची उदयोग भरारी कार्यक्रमासाठी अमरावती पोहोचले. कार्यक्रम पुर्ण करुन ते दुपारी 4.30 वाजता दरम्यान बेलोरा विमानतळ येथे छत्रपती संभाजीनगरला जाण्याकरीता पोहोचले. त्यावेळी मंत्री सावंत हे विमानात बसण्यासाठी जात असतानाच, विमानचा पायलट गगन अरोरा यांनी मंत्री यांचे विमानातील साहीत्य बाहेर काढल्याचे लक्षात आले.

त्याची कोणतीही पुर्व कल्पना पायलट यांनी सावंत यांना दिली नाही. नियोजीत दौरानुसार छत्रपती संभाजीनगर येथे सांयकाळी 6 वाजता महाराष्ट्राची उदयोग भरारी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यासाठी किमान सायंकाळी 5 वाजता बेलोरा विमानतळाहून विमान टेकऑफ करणे गरजेचे होते. कारण छत्रपती संभाजीनगर येथील कार्यक्रमासाठी किमान 3000 लाभार्थी तथा नागरीक जमा झाले आहेत. त्यामुळे तेथे वेळेत पोहचणे गरजेचे आहे, अशी विनंती मंत्री सावंत यांनी पायलट कॅप्टन गगन अरोरा यांना केली. परंतु तरी सुदधा पायलट गगन अरोरा यांनी अन्य काही नियम सांगुन आम्ही विमानाचे उडडान करु शकत नाही, असे म्हणुन छत्रपती संभाजीनगर येथे विमान नेण्यास नकार दिला. त्यानंतर स्वत: मंत्री सावंत यांनी कंपनीचे मालक कॅप्टन गहलोत यांच्याशी संपर्क साधला. त्यांनीही पायलट यांना टेकऑफची सुचना केली नाही. यामुळे मंत्री सावंत यांना मानसिक व शारीरीक त्रासाला सामोरे जावे लागले. त्यातच मंत्री सावंत यांना बेलोरा ते संभाजीनगर हा 310 किमीचा प्रवास कारने करावा लागला.

> विमानाची उड्डान भरण्यास नकार दिल्याबद्दल तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुसार चौकशी करण्यात येईल. संबंधित प्रकरणाविषयी पत्र व्यवहार करण्यात येईल.
>
> **सतिश खेडकर, एपीआय, लोणी**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# कापसाच्या झाल्या वाती, सोयाबीन, संत्रा झाडे झाले वांझोटी

## परतीच्या पावसाने खरीप पिकांचे अतोनात नुकसान | हातातोंडाशी आलेला घास हिरावला

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.28 )** – परतीच्या पावसाने हातातोंडाशी आलेला घास हिरावल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली असुन कापसाच्या वाती, तुरीच्या तुराट्या आणि सोयाबीन, संत्राझाडे वांझोटी झाली आहे.

परतीच्या पावसाने खरीपातील पिकांचे अतोनात नुकसान केल्याने मदतीची याचना शेतकरी शासनाकडे करीत आहे. खरीपातील लागवाडीसाठी सुरवातीला अपेक्षीत समाधानकारक पाऊस पडला नाही, सुरवातीचे नक्षत्र कोठे बरसली, तर कोठे नुसती शिंपडल्यासारखी आली. बळीराजाने छातीला माती लावुन काळ्या आईच्या कुशीत बियाणे पेरले. नंतर पर्जन्यराजा मेहेरबान झाल्याने कापुस, सोयाबीन, तुर खरीपातील अन्य पिके बहारात येऊन शेतशिवार फुलले होते, त्यामुळे जगाचा पोशींदा आनंदी होता. मृग ते मघा नक्षत्रा पर्यंत काळ्या आईला हिरवा शालू नेसवण्यासाठी खांद्याला खांदा लाऊन झटणाऱ्या नंदी राजाच्या ऋणातून उतराई होण्यासाठी केलेला प्रयत्न म्हणजे बैला पोळा सणानंतर नंतरच्या परतीच्या पाऊसाने खरीपातील पिकांचे अतोनात नुकसान झाले. या नुकसानामूळे शेतकर्यांची चिंता वाढली असुन कापसाच्या वाती, तुरीच्या तुर्हाट्या, सोयाबीन, संत्राझाडे वांझोटी झाल्याचे चित्र सर्वत्र शेतात दिसुन येते. या नुकसानीबाबत महसुल तथा कृषी विभाग मात्र काळजीवाहु दिसत नसल्याने आता या अतीवृष्टीच्या पावसाने नुकसान तर झाले. त्यामुळे पिक पाहणी, पंचनामे न करता खरीप हंगामातील पिकांना सरकट मदतीची याचना शेतकरी शासनाकडे करीत आहे.





# अखेर आरटीओ कर्मचाऱ्यांची तलवार म्यान

## प्रशासनाकडून अनेक मागण्या मान्य



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )**- महसुली बदल्या रद्द करण्यात याव्यात तसेच आकृतीबंधाची अंमलबजावणी करण्यात यावी या प्रमुख मागण्यासाठी मोटर वाहन विभाग आरटीओ कर्मचारी संघटनेने राज्यभरात गेल्या तीन दिवसांपासून उपसलेली बेमुदत संप तलवार अखेर गुरुवारी रात्री म्यान केली. परिवहन आयुक्त कार्यालयात कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळासोबत सकारात्मक चर्चा झाल्यानंतर हा संप स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

> महसुली स्तरावर वेगवेगळे विभाग एकत्र करण्याचा निर्णय अन्यायकारक होता. तो रद्द करुन आता पूर्वीप्रमाणेच राहणार आहे, तसेच आकृतीबंधानुसार पदोन्नती केली जाणार असल्याची बैठकीत मान्य करण्यात आले, कळस्कर समितीच्या अहवालावर सुद्धा बैठकीत निर्णय झाला. प्रशासनाने इतर मागण्यावरही सकारात्मक निर्णय घेण्याचे मान्य केले . प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या मागण्या मान्य केल्याने, आता मागील तीन दिवसांपासून सुरू असलेला बेमुदत संप मागे घेण्यात आला.
>
> **अनिल मानकर,**
> **राज्य उपाध्यक्ष, मोटर वाहन विभाग कर्मचारी संघटना तथा अध्यक्ष तथा अमरावती विभागीय आरटीओ कर्मचारी संघटना.**

शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेदरम्यान 30 नोव्हेंबर पर्यंत वरिष्ठ लिपिक ते कार्यालय अधीक्षक पदाचे सेवा प्रवेश नियम अंतिम करण्यात येतील, पूर्वीप्रमाणेच पंधरा विभागा अंतर्गत बदल्या करण्याचे मान्य केले. प्रशासनाने इतर मागण्यावरही सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले. परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत तब्बल दोन तास बैठक झाली. या बैठकीत प्रमुख दोन्ही मागण्या मान्य केल्याने हा संप स्थगित करण्यात आला. कळस्कर समितीचा सुधारित अहवाल लागू करण्यात येईल, विभाग बाह्य समायोजन रद्द करण्यात येईल, सेवाप्रवेशातील जाचक अटी रद्द करत आधी मागण्या मान्य करण्यात आल्या. आपल्या प्रलंबित मागण्यांकरिता गेल्या 24 सप्टेंबर पासून कर्मचारी संघटनेने बेमुदत संप सुरू केला होता. राज्यभरातील सर्व आरटीओ कार्यालय ओस पडली. अधिकाऱ्यांशिवाय इतर कोणतेही कर्मचारी तीन दिवस कार्यालयीन कामात सहभागी झाले नाही. त्यामुळे कामाचा मोठा खोळंबा निर्माण झाला. कर्मचाऱ्यांच्या या संपामुळे तीन दिवसात परिवहन विभागाला मोठा आर्थिक फटका बसला.

# माझी वसुंधरा अभियान 4.0 मध्ये विभागस्तरावर अमरावती मनपा प्रथम

**शासनाकडून 1.50 कोटीचे बक्षीस जाहिर**

**अमरावती** – पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या निसर्गाशी संबंधीत पंचतत्वावर आधारित माझी वसुंधरा अभियान हे अमरावती महानगरपालिकेने 1 एप्रिल 2023 ते 31 मार्च 2024 या कालावधीत राबविले. माझी वसुंधरा अभियान 4.0 मध्ये अमृत गट अमरावती विभाग स्तरावर अमरावती महानगरपालिकेचा प्रथम क्रमांक आलेला आहे. मागील तीन वर्षापासून अमरावती महानगरपालिका या गटात प्रथम क्रमांकावर आहे. माझी वसुंधरा अभियान 4.0 मध्ये अमरावती महानगरपालिकेला 1.50 कोटी रुपयाचे बक्षिस जाहिर करण्यात आले आहे.

# शेतातील विहिरीतील पाण्याची मोटार चोरी

## ऐरंडगाव शेतशिवारातील घटना



**महासागर प्रतिनिधी**

अमरावती– चांदूर रेल्वे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ऐरंडगाव शेत शेतशिवारातील विहिरीतून अज्ञात चोरट्यांनी पाण्याची मोटार चोरून नेली. चोरीला गेलेल्या मशीनची किंमत तीन हजार रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. याप्रकरणात अरुण नारायण डुकरे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

चांदूर रेल्वे तालुक्यातील ऐरंडगाव येथील रहिवासी अरुण डुकरे यांच्याकडे 2 एकर शेती आहे. त्यांनी पिकांना पाणी देण्यासाठी विहिरीत पाण्याची मोटार बसविली होती. मात्र 27 सप्टेंबर रोजी रात्री अज्ञात चोरट्यांनी चोरी केली. त्यामुळे अरुण डुकरे यांनी या घटनेची तक्रार चांदुररेल्वे ठाण्यात दिली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# मूळ कागदपत्रे वापरून चालकाने विकली कार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 28 )** – शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील करजगाव येथे एका चालकाने मालकाला न विचारता मूळ कागदपत्रांचा वापर करून कार विकल्याची घटना समोर आली आहे. कार मालक भगवान रामदास गोर्ले (50, राजापेठ) यांच्या फिर्यादी वरून शिरजगाव कसबा पोलिसांनी अमोल पुरुषोत्तम गणोरकर (35, सोनारपुरा, करजगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अमरावती शहरातील राजापेठ येथील रहिवासी भगवान रामदास गोर्ले यांनी आरोपी अमोलला त्यांच्या मालकीच्या वाहनावर चालक म्हणून नियुक्त केले होते. त्यामुळे हे वाहन आरोपींकडेच राहात होते. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून तो वाहन घेऊन येत नसल्याने भगवान गोर्ले याने त्याच्या मित्राला अमोलच्या घरी जाऊन वाहन पाहण्यास सांगितले. त्यावर भगवानच्या मित्राला समजले की अमोलने कारची मूळ कागदपत्रे वापरून कार दुसर्या व्यक्तीला विकली होती. त्यानंतर भगवान गोर्ले यांनी याप्रकरणी शिरजगाव कसबा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी आरोपी अमोल गणोरकर याच्याविरुद्ध कलम 316 (2) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# प्रत्येक वाढदिवस नवी उर्जा देणारा-अभ्यंकर

## दणक्यात साजरा झाला मधूकर अभ्यंकर यांचा वाढदिवस

### विविध क्षेत्रातील मंडळीची उपस्थिती




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )**- आतापर्यंत साजरा करण्यात आलेला माझा प्रत्येक वाढदिवस हा उर्जा देणारा ठरला, विविध क्षेत्रातील लोकांची माझेविषयी प्रेम पाहून हायसे वाटते, असे प्रतिपादन येथील राहूल व्यायाम प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, समाजभूषण मधुकरराव अभ्यंकर यांनी केले. त्यांचा नुकताच 80 वा वाढदिवस साजरा करण्यात आला, यावेळी ते सत्काराला उत्तर देताना बोलत होते. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, वृक्षप्रेमी अश्या विविध क्षेत्रातील मान्यवरांनी यावेळी उपस्थिती राखली होती.

स्थानिक भूमिपुत्र कॉलनी येथे त्यांच्या निवासस्थानी सर्वप्रथम तथागत भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमांचे पूजन करून त्रिशरण, पंचशिल ग्रहण करण्यात आहे. त्यानंतर मधुकरराव अभ्यंकर यांनी केक कापला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी पुष्प गुच्छ व रोपटे देत त्यांच्या दीर्घ आयुष्याकरिता शुभेच्छा दिल्या. अभ्यंकर यांनी यावेळी आलेल्या प्रत्येकांशी संवाद साधत हितगुज केले.

यावेळी आचार्य कमल गवई, खासदार बळवंत वानखडे, आमदार रवी राणा, आमदार धीरज लिंगाडे यांनी उपस्थिती दर्शवित मधुकरराव अभ्यंकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी राहुल व्यायाम प्रसारक मंडळाचे अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर, जयकुमार अभ्यंकर, ॲड. शुभांगी थेटे, प्राचार्य गजानन वानखडे, शुभांगी अभ्यंकर, पद्मा ढेपे, सुषमा कोंडे, सतीश कोंडे ,माजी प्राचार्य सतीश पुंडकर, गोविंदराव अगम, रामेश्वर अभ्यंकर, ॲड. सतीश बोरकर, ॲड. पठाण, सुखदेवराव सरदार, एल.जे.वानखडे, प्रा. श्रीकृष्ण बनसोड, डॉ. भीमराव वानखडे, कॅप्टन शिरसाट, भीमराव डहाके, जुम्मा नंदावाले, प्राचार्य दिनेश मोहोड, उद्धवराव कविटकर, प्राचार्य दिनेश थोरात, मुख्याध्यापक केतन खिरकर, मुख्याध्यापक अमित वानखडे, सागरसिंह चव्हाण, प्राचार्य अविनाश पवार, मुख्याध्यापक मुकुंद चौधरी, संत गाडगेबाबा पतसंस्था परतवाडाचे अध्यक्ष उद्धवराव कोकाटे, प्रा. अनिल गवई, गोविंदराव फसाटे, रमेश कौतिककर, मनोज जामनिक यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.


# ज्ञानेश्वर वाघाडे यांचे निधन



**हिवरखेड**– येथील माजी ग्रामपंचायत सदस्य दिनेश वाघाडे यांचे वडील ज्ञानेश्वरराव तिमाजी वाघाडे यांचे दि. 25 सप्टेंबर 2024 ला रोजी सायंकाळी 7.30 वाजता निधन झाले. मृत्यू समयी ते 65 वर्षाचे होते. त्यांचेवर दि.26 सप्टेंबर 2024 ला 1 वाजता निर्मिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे मागे पत्नी, एक मुलगा, सुन, नातु व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# कार्तिक मास मांड चा होणार शुभारंभ

- ‘अमावस्या’ निमित्त चंदनउटी व प्रवचनाचाही कार्यक्रम
- श्री.क्षेत्र सावंगा( विठोबा ) संस्थानचे आयोजन



**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे( दि.28 )** – तालुक्यातील श्री.क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे (बुधवार) दि.2 सप्टेंबर 2024 सकाळी 5 वाजता कार्तिक मास मांडीची सुरुवात लहान मंदिरात ढाल बसवून मुख्य मंदिरात महाराजांच्या अरजेने विश्वस्त मंडळाचे उपस्थितीत करण्यात येणार आहे. तसेच दुपारी 4 वाजता संस्थानच्या वतीने ‘अमावास्या’ निमित्त ‘चंदन- उटीचा’ कार्यक्रम आणि रात्री 8 ते 10 वाजता अवधूत नाम प्रबोधनकार रेखा सुरकार, तळेगाव (टालाटुली, जि.वर्धा) यांचा महाराजांचे ओवीवर प्रवचन कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

या कार्यक्रमाकरिता अन्नदान दाते शीला गजानन कांबळे,(कवाडी जि.वर्धा) व किसना प्रल्हाद हिवाळे (हरसुल जि. यवतमाळ) यांचे सहभागातून आणि संस्थानचे अन्नदान समितीच्या नियंत्रणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्तिक मास मांडीमध्ये बाहेरगावातील अवधूत भजन मंडळांचा दैनंदिन सहभाग राहणार आहे. त्याकरिता संस्थानच्या वतीने दि. 2 ऑक्टोबर ते 15 नोव्हेंबर 2024 या कालावधीत भजन पाळीचे नियोजन तयार करण्यात आले आहे. यात सहभागी अवधूत भजन मंडळांकरिता संस्थानच्या वतीने चहा, नाश्ता आणि भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच श्रीफळ देऊन मंडळांचा सत्कार आणि नवीन सहभागी मंडळांना महाराजांची गाथा भेट म्हणून देण्यात येणार आहे. बाहेर गावावरून येणारे भाविकांकरिता संस्थानचे अन्नदान समितीच्या वतीने दैनंदिन महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच संस्थानचे प्रसादालयामध्ये प्रसाद देणगी पावती घेऊन भाविकांना प्रसादाचा लाभ घेवू शकतील. संस्थानचे गौरक्षणमध्ये भाविकांनी दान दिलेल्या गायी आहेत, त्यांची देखभाल संस्थान करीत आहेत. त्या गायीकरिता चाऱ्याची नितांत आवश्यकता आहे. जे इच्छुक दाते असतील, त्यांनी गौरक्षण मधील गायीकरिता चारा पाठवण्याची व्यवस्था करावी, असे संस्थानच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे. सर्व भाविक- भक्तांनी तन-मन-धनाने सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, अशी विनंती संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे उपाध्यक्ष कृपासागर राऊत सचिव अशोक सोनवाल सर्व विश्वस्त विनायक पाटील, वामन रामटेके, गोविंद राठोड, दिगांबर राठोड, अनिल बेलसरे, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी समस्त विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# रेबीजबद्दल भीती नाही, सावधगिरी बाळगा

## जागतिक रेबीज दिनानिमित्त जनजागृती



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.28 )** – जागतिक रेबीज दिन दि. 28 सप्टेंबर रोजी साजरा करण्यात आला. रेबीज दिनानिमित्त आजाराबाबत जनजागृती करत रेबीजबद्दल भीती नाही, तर सावधगिरी बाळगण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले..

जागतिक रेबीज दिनाचा उद्देश मानव आणि प्राण्यांवर रेबीजच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता वाढविणे, धोकादायक रोग रोखता येईल, याविषयी माहिती आणि सल्ला प्रदान करणे आणि रेबीज नियंत्रणातील वाढीव प्रयत्नांसाठी प्रयत्न करणे आहे.

रेबीज हा उष्ण रक्ताचे प्राणी कुत्रा, ससा, माकड, मांजर चावल्यानंतर होतो. या रोगामध्ये रोगी पाण्याला घाबरत असल्याने त्यास जलसंत्रास म्हणतात. रेबीज रोग झाल्यास प्राणघातक आहे. मात्र रोग होण्यापूर्वी लस देऊन त्यापासून संरक्षण करता येते. रेबीज हा रोग कुत्र्यांनाही होतो. हा कुत्र्यांमुळे माणसात पसरणारा रोग आहे. कुत्रा चावल्यानंतर या आजाराची लक्षणे 90 ते 175 दिवसात दिसू लागतात. जंगलातले लांडगे जंगली कुत्र्यांना चावतात, त्यामुळे जंगली कुत्र्यांना रेबीज होतो. ही जंगली कुत्री गावातल्या कुत्र्यांना चावतात, त्यामुळे त्यांना हा रोग होतो. आणि रेबीज झालेली कुत्री माणसांना चावल्यास हा रोग होतो. कुत्र्यांच्या लाळेद्वारे रोगाचा प्रसार होतो.

या रोगाची लक्षणे ही साधारणपणे 2 ते 12 आठवडे ताप आणि तापाची लक्षणे दिसतात. मानसिक त्रास, निद्रानाश, भास होणे, सामान्य माणसासारखे न वागणे, अतिशयोक्ती करत वागणे अशी लक्षणे दिसून येतात. रेबीज झालेल्या माणसाला पाण्याची भिती वाटते. रेबीज झालेल्या माणसाचा घसा पूर्णपणे खरवडून निघतो. माणूस काही बोलण्याचा प्रयत्न करतो तेव्हा घसा खरवडलेला असल्यामुळे कुत्र्यांच्या भुंकण्याप्रमाणे आवाज येतो. वास्तविक कुत्रा चावला म्हणून असा आवाज येतो असे नाही. पण काही अशिक्षित माणसे असा विचार करून कुत्र्यांना मारतात.

### वेळीच उपाय करुन वाचवा जीव

या आजारावर उपचार म्हणून चावल्याने जखम झाल्यावर लवकरात लवकर साबण व स्वच्छ पाण्याने धुतल्यास जखमेतील रेबीजचे जंतू कमी होण्यास मदत होते. शक्य असल्यास त्यावर ॲण्टीसेप्टीक मलम लावावे. त्वरीत जवळच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. रेबीजवर पीईपी पोस्ट एक्स्पोजर प्रोफायलॅक्सिस ही प्रभावी लस उपलब्ध असून कुत्रे चावल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने ती टोचून घेणे योग्य आहे. पेशंटने मानवी रेबीज इम्युनोग्लोबुलिनचा एक डोस व रेबीज लसीचे चार डोस 28 दिवसात घेतले पाहिजेत. रेबीज लसीचा पहिला डोस जखम झाल्यावर लवकरात लवकर घेतला पाहिजे. त्यानंतर 3 दिवस, 7 दिवस आणि 28 दिवसांनी लसीचे डोस द्यावेत. आता पोटात घ्यायचे इंजेक्शन देण्याची गरज नसून दंडावर देण्याचे इंजेक्शन उपलब्ध आहे, असे आरोग्य विभागाने कळविले आहे.

# शिवाजीच्या एनसीसी छात्र सैनिकांकडून नदी पात्राची स्वच्छता

## स्वच्छता ही सेवा मोहिमेअंतर्गत राबविला उपक्रम




**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ( दि.28 )** – श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचलीत शिवाजी उच्च माध्यमिक शाळा मोर्शी च्या 8 महाराष्ट्र बटालियन च्या एनसीसी कॅडेट( छात्र सैनिक) च्या वतीने जलशुद्धीकरण या अंतर्गत नदी स्वच्छता अभियान राबविले.

यावेळी नदी पात्रात अडकलेला कचरा, वाहत आलेले प्लास्टिक तसेच इतर कचरा वेचून एनसीसीच्या कडेट्स नी नदीपात्राची स्वच्छता केली. या स्वच्छता मोहिमेत एनसीसी पथकातील 80 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. शाळेचे मुख्याध्यापक तथा माजी एनसीसी अधिकारी श्रीकांत देशमुख यांचे मार्गदर्शनात शिक्षक पवन भागवत यांनी विद्यार्थ्यांकडून हा उपक्रम करून घेतला. तसेही मोर्शीच्या शिवाजी शाळेतील एनसीसी पथक तालुक्यातील प्रत्येक सामाजिक कार्यात नेहमी आपला सहभाग नोंदवित असते. या उपक्रमात सहभागी सर्व एनसीसी कॅडेटचे पर्यवेक्षक मिलिंद ढाकुलकर, उपमुख्याध्यापक रवींद्र जावरकर, उद्धव गिद ,अशोक चौधरी तसेच सर्व शिक्षक शिक्षिका यांनी कौतुक केले.